# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २४.०७.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१८.०७.२०२६ ते २४.०७.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२५.०७.२०२६ ते २९.०७.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | दिनांक | | २५ | २६ | २७ | २८ | २९ |
| १३.६ | ११.८ | ३२.२ | ३.८ | १३.८ | ४०.२ | ०.८ | पाऊस (मिमी) | | १८ | १९ | १८ | १२ | १६ |
| २५.५ | २७.० | २७.० | २७.४ | २७.० | २५.४ | २६.४ | कमाल तापमान (अं.से.) | | २८ | ३० | ३० | ३१ | ३० |
| २२.६ | २२.२ | २१.२ | २२.८ | २२.२ | २१.८ | २३.० | किमान तापमान (अं.से.) | | २३ | २३ | २३ | २४ | २४ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | स. | ढग स्थिती (आकाश) | ७ | ७ | ६ | ७ | ७ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | दु. | | | | | | |
| ९४ | ९५ | ९६ | ९० | ९५ | ९७ | ९८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८५ | ८५ | ८६ | ८६ | ८६ |
| ८९ | ८६ | ८७ | ८५ | ८८ | ९६ | ८५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८३ | ८४ | ८५ | ८३ | ८१ |
| ४.० | ४.७ | ४.४ | ७.३ | ७.५ | ६.० | १२.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | २७ | १९ | १७ | १६ | १५ |
| प. | नै. | प.नै. | प. नै. | नै. | प.नै. | प.वा. | स. | वाऱ्याची दिशा | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. |
| नै. | प.नै. | नै. | नै. | प.नै. | नै. | नै. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ११६.२ | ५५६.० | २७ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला | | |
|---|---|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २५, २६ ,२७, २८ व २९ जुलै रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील घाट भागात २५, २६ व २७ जुलै रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर २८ व २९ जुलै रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. मध्य व पूर्व भागात २५, २६ व २७ जुलै रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची तसेच २८ व २९ जुलै रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २९ जुलै पर्यंत कमाल तापमान २८.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २३.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८५ ते ८६%, दुपारची सापेक्ष आद्रता ८१ ते ८५% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १५ ते २७ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. | | |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २४ ते ३० जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. दिनांक ३१ जुलै ते ६ ऑगस्ट दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. | | |
| **हवामान इशारा** | | २४.०७.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | | २५.०७.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | | २६.०७.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ मुसळधार पावसाचा इशारा असल्याने घाट भागातील शेतकरी बांधवांनी शेतामध्ये साठणाऱ्या पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा होईल याची व्यवस्था करावी<br>❖ कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी. | | |
| संदेश | | भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ से.मी तर रोपांच्या वाढीच्याअवस्थेत २ ते ३ से.मी. ठेवावी. | | |
| भात | पुनर्लागवड | ➢ ज्या भागामध्ये पुनर्लागवड झालेली आहे अश्या ठिकाणी भात पिकास संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी<br>➢ ज्या ठिकाणी पुरेश्या पाण्याअभावी पुनर्लागवड थांबली आहे त्या ठिकाणी भात रोपवाटीकेतील रोपांना प्रती गुंठा अर्धा किलो युरियाची अतिरिक्त मात्रा द्यावी किंवा १ % युरियाची फवारणी करावी<br>➢ जर भात रोपलागणीचा कालावधी ३० दिवसापेक्षा जास्त असेल तर रोप लागण करताना रोपांची संख्या एका चूडामध्ये ३ ते ४ एवढी | | |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | ठेवावी |
| नाचणी | रोपवाटिका | ➢ घाट भागात पावसाचा अंदाज असल्याने गादीवाफ्यावरील रोपे २० ते २५ दिवसांची झाल्यानंतर शेतामध्ये रोपांची पुनर्लागवड करावी<br>➢ लावणीचे अंतर : दोन ओळींमधील अंतर 30 से.मी. व दोन रोपांमधील अंतर १० सें.मी. ठेवावे<br>➢ लागवड करताना शिफारशीत खत मात्रा ३०:३०:३० नत्र:स्फुरद: पालाश किलोग्रॅम/ हेक्टर प्रमाणे रासायनिक खत द्यावे.<br>➢ त्यासाठी युरिया ०.६५० किलोग्रॅम, सिंगल सुपर फॉस्फेट १.८७ किलोग्रॅम व ०.५ किलोग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश ही खतमात्रा प्रती गुंठा याप्रमाणे द्यावी. |
| मका | वाढीची | ➢ जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असेल त्या भागात शेतकरी बंधु कमी कलावधीत येणाऱ्या मका वाणांची तसेच मधु मकाची लागवड करू शकतात. लागवड शक्यतो सरी ओरंब्यावर ७५ x २० सेमी अंतरावर करावी<br>➢ ज्या शेतांमध्ये लवकर पेरणी झालेली असून पानांवर पिवळेपणा दिसून येत असेल, त्या ठिकाणी नत्राची कमतरता भरून काढण्यासाठी व पिकाची वाढ सुधारण्यासाठी १% युरियाची फवारणी करावी.<br>➢ पेरणीनंतर १० ते १२ दिवस पूर्ण झाल्यास आवश्यकतेनुसार विरळणी करावी. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी फुले सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-II ची फवारणी करावी.<br>➢ मक्यावरील लष्करी अळीच्या सर्वेक्षणासाठी एकरी ५ कामगंध सापळे वापरावेत आणि शेताचे प्रत्यक्ष निरीक्षण करावे.<br>➢ रोपावस्था ते सुरुवातीची पोंग्याची अवस्था या कालावधीत मक्यावरील लष्करी अळीमुळे ५% प्रादुर्भावग्रस्त झाडे आढळल्यास मेटारायझीयम अनिसोप्ली किंवा मेटारायझीयम रीलेयी या जेविक बुरशीनाशकांची ५० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात पोंग्यामध्ये द्रावण जाईल अशाप्रकारे फवारणी करावी.<br>➢ किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ दिसून येत असल्यास ५ टक्के निबोळी अर्क किंवा अॅझाडिरॅक्टिन १५०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ आडसाली लागण करण्यासाठी को ८६०३२, फुले २६५ व फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ आणि फुले ऊस १५००६ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांची जमिनीच्या मगदूरानुसार उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ ऊस पिकावर काही ठिकणी गवताळ वाढ या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रसार रोखण्यासाठी प्रादुर्भाव ग्रस्त रोपे उपटून शेतापासून लांब जाळून नष्ट करावीत.<br>➢ मागील आठवड्यामध्ये वाढलेल्या आद्रतेमुळे काही ठिकाणी तपकिरी ठिपके व तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी शिफारशीत बुरशीनाशकाचा वापर करावा<br>➢ बीजप्रक्रिया : बुरशीजन्य रोगांचा बंदोबस्त करण्यासाठी बेणे लागणीपूर्वी १० लिटर पाण्यात १० ग्रॅम कार्बेन्डॅझिमची १० मिनीटांसाठी बेणे प्रक्रिया करावी. त्यानंतर हेक्टरी १० किलो अॅसेटोबॅक्टर + १.२५ किलो पी.एस.बी. १०० लिटर पाण्यात ३० मिनिटे जीवाणू बीजप्रक्रिया करावी. यामुळे नत्रखतामध्ये ५०% ची तर स्फुरदखतामध्ये २५% ची बचत करता येते.<br>➢ लागवड तंत्र : उसाच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी जमिनीसाठी १२० ते १५० सें.मी. अंतरावर सरी पाडावी. ५ फुटावरील सरी ही यांत्रिक पध्दतीने मशागत, फवारणीद्वारे वापरण्यात येणारी (संजिवके, विद्राव्य अन्नद्रव्ये, बुरशीनाशके, किडनाशक), आंतरपिक, ऊस तोडणी, आणि खोडव्या मध्ये पाचट ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते. ५ फुट सरीवर रोपे वापरून उसाची लागण करून उच्चांकी उत्पादन घेता येते<br>➢ रोप लागण : ट्रेमध्ये कोकोपीट व बेणेमळयातील शुध्द, निरोगी बेणे वापरून तयार केलेली ३० ते ३५ दिवसांची रोपे लागवडीसाठी वापरावीत. ऊस रोपे तयार करताना कांड्यांसाठी बुरशीनाशक व जिवाणूंची बीज प्रक्रिया करावी. रोपे वापरून उसाची लागण केल्यास, एकरी उसाची संख्या ३५ ते ४५ हजार मिळू शकते.<br>➢ सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञानाने रोपे करून ती २१ ते २८ दिवसात लागवडीसाठी वापरावीत. |
| सोयाबीन | वाढीची | ➢ १५ जुलै पर्यंत सोयाबीनची पेरणी करणे योग्य असते. मात्र २० जुलै नंतर सोयाबीनची पेरणी करणे टाळावे.<br>➢ पेरणी करून ५ ते ६ दिवस झाले असल्यास पक्ष्यांचा त्रास जाणवू शकतो त्यामुळे १० ते १२ दिवस पक्ष्यांपासून राखण करावी<br>➢ पेरणी नंतर अंकरून होत असल्यास या परिस्थितिमध्ये शेतामध्ये पाणी साठू देऊ नये अन्यथा बी कुजून जाऊ शकते<br>➢ किडींच्या नियंत्रणासाठी जमिनीपासून ३ फुट उंचीवर एकरी ३ या प्रमाणात स्पोडोल्युर असलेले कामगंध सापळे लावावेत<br>➢ किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास प्रथम रासायनिक किटकनाशक फवारणे टाळावे त्याऐवजी फुले मेटारायझियम ५ ग्रॅम प्रती १० लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ पेरणीनंतर २० ते २५ दिवस झाले असल्यास कोळपणी व खुरपणीची कामे करून तण नियंत्रण करावे. |
| भुईमूग | वाढीची | ➢ पेरणीनंतर २० ते २५ दिवस झाले असल्यास कोळपणी व खुरपणीची कामे करून तण नियंत्रण करावे. |
| मिरची | वाढीची | ➢ पुनर्लागवडीनंतर तीन आठवडे पूर्ण झाल्यावर कोळपणी व खुरपणी करून तणांचे नियंत्रण करावे तसेच रोपांना मातीची भर द्यावी. पिकास हेक्टरी २५ किलो नत्राची मात्रा द्यावी.<br>➢ रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के एस.एल. २.५ मिली किंवा फिप्रोनिल ५ टक्के एस.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ पावसाळ्यात फवारणी करताना द्रावणामध्ये ०.१ टक्के स्टिकर (चिकट द्रव्य) वापरावे.<br>➢ रसशोषक किडींच्या निरीक्षण व नियंत्रणासाठी एकरी २० ते २५ निळे चिकट सापळे लावावेत. |
| वांगी | वाढीची अवस्था | ➢ वांग्यावर शेंडे पोखरणारी अळी जास्त प्रमाणात दिसून येते. यामध्ये अळी प्रथमतः झाडावर फळे नसताना कोवळया शेंड्यात शिरून आतील भाग खाते. त्यामुळे शेंडे वाळतात. नंतर फळे आल्यावर फळात शिरुन आतील भाग खाते. त्यामुळे अशा फळांना बाजारात किंमत मिळत नाही. या किडीमुळे फळांचे ४०-५० टक्के नुकसान होऊ शकते. याच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर २० दिवसांनी दर |

| | | |
|---|---|---|
| | | आठवड्याला किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत किंवा खोल खड्ड्यात पुरून टाकावी.<br>➢ शेतामध्ये फळे पोखरणाऱ्या आळीच्या नियंत्रणासाठी एकरी ४० कामगंध सापळे (फनेल टाईप) लावावेत. |
| पशुधन | वाढीची | ➢ मागील काही दिवसांपासून पाऊस, उघडीप आणि पुन्हा पाऊस अशा बदलत्या हवामानामुळे जनावरांच्या गोठ्यात डास, माश्या व गोचिडींचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. त्यांच्या नियंत्रणासाठी गोठा व परिसर स्वच्छ आणि कोरडा ठेवावा तसेच गोठ्यात नियमितपणे धुरी करावी. विशेषतः गोचिडींचे वेळीच नियंत्रण केल्यास जनावरांना थायलेरिओसिस रोगापासून संरक्षण मिळू शकते.<br>➢ जनावरांच्या पिण्याच्या पाण्याच्या हौदात शेवाळ निर्माण होऊ नये यासाठी हौदाची नियमित स्वच्छता करावी आणि शिफारशीनुसार आतील बाजूस चुना लावावा.<br>➢ जनावरांच्या संतुलित पोषणासाठी हिरवा आणि सुका चारा योग्य प्रमाणात द्यावा. |

| मेघदूत अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |
|---|---|

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : २४.०७.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर